# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/registrar@unigug.ac.in

जा.क्र. /गोंविग/कुसका/ ६०४२ /२०२६ दि.२५/०८/२०२६

**प्रति,**
मा. प्राचार्य,
संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:** - कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांच्या तर्फे आयोजित रोजगार महाकुंभ महाराष्ट्र - २०२६ (पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा) या उपक्रमाअंतर्गत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मेळाव्यापूर्वी मुलाखत पूर्व प्रशिक्षण देण्याबाबत आवश्यक सूचना.

**संदर्भ :-** जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/५२०-२१/२०२६, दि. २४/०८/२०२६ नूसार.

महोदय,

वर उल्लेखीत विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, संलग्नीत पत्रानुसार जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली यांच्याव्दारे विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मिळण्यापूर्वी मुलाखत पूर्व प्रशिक्षण देण्याबाबत आवश्यक सूचना प्राप्त झालेली आहे.

संलग्न पत्राचे अवलोकन करुन आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही घेण्यात यावी.
धन्यवाद !

संलग्न :- संदर्भीय पत्र.

**(डॉ. अनिल हिरेखण)**
कुलसचिव

**प्रतिलिपी :-**
१. मा. कुलगुरूंचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र- कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
शासकीय संकुल बॅरेक क्रमांक-२ युनिट क्रं-२,कॉम्प्लेक्स,गडचिरोली-४४२६०५
ई-मेल : asstdiremp.gadchiroli@ese.maharashtra.gov.in/gadchirolirojgar@gmail.com
Webside :-http://www.mahaswayam.gov.in
Phone:-07132-222368

जाक्रं/जिकौविरोवउमाके-गड/रो.मे./२६-२७/ 1520-21 /२०२६ दिनांक . २४, ऑगस्ट ,२०२६

प्रति,

मा.कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.

विषय :- दिनांक. १७ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आयोजित "रोजगार महाकुंभ महाराष्ट्र-२०२६" अंतर्गत पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यासाठी आपल्याकडील उमेदवारांना सदर मेळाव्यामध्ये सहभागी होण्यापुर्णी पुर्व प्रशिक्षणाकरीता ऑनलाईन फॉर्म भरण्याकरीता सुचना देणेबाबत.

संदर्भ :- १. मा.ना.श्री.मंगलप्रभात लोढा, मा.मंत्री कौशल्य विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक ०५७९/२०२६ दिनांक.१३.०८.२०२६.

२. मा.आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक.१४.०८.२०२६ आणि दि.१९.०८.२०२६ रोजीच्या ऑनलाईन बैठकीतील निर्देश.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सविनय सादर करण्यांत येते की, भारताचे पंतप्रधान मा.श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून, त्यांनी सदैव जपलेल्या " युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती " या संकल्पनेला अनूसरून या विभागामार्फत एक महत्वपुर्ण उपक्रम हाती घेतले आहे. दिनांक. १७ सप्टेंबर २०२६ रोजी संपुर्ण राज्यात एकाच दिवशी, एकाच वेळी ५०० ठिकाणी रोजगार मेळावे / प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करून राज्याच्या रोजगार क्षेत्रात एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे. राज्यातील युवकांना त्यांच्या परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मूळ गाभा असून हा उपक्रम राज्यातील प्रत्येक जिल्हा,तालुका व औद्योगिक परिसरांमध्ये राबविण्यांत येत आहे.

त्यानुषंगाने गडचिरोली जिल्हयामध्ये १) शिवाजी महाविद्यालय,गडचिरोली २) महात्मा गांधी कला , विज्ञान महाविद्यालय,आरमोरी, ३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( ITI ) वडसा , ४) शहीद बिरसामुंडा महाविद्यालय, कोरची ५) शिवाजी ज्युनिअर कॉलेज ,चामोर्शी, ६) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( ITI ) आलापल्ली, ७) भगवंतराव आटर्स ॲण्ड सायन्स कॉलेज , एटापल्ली ८) श्री.जीवनराव सिताराम पाटील मुनघाटे आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज , धानोरा या सर्व तालुक्यामध्ये दिनांक. १७ सप्टेंबर २०२६ रोजी एकाच दिवशी रोजगार मेळावे अथवा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करण्यांत येत आहे. सदर रोजगार मेळाव्यामध्ये विविध ठिकाणांतील नामांकित कंपन्या सहभागी होणार असून त्यांच्या उपलब्ध रिक्त पदांसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून पात्र उमेदवारांना तात्काळ रोजगार उपलब्ध करून दिले जाणार आहे.

त्याकरीता गरजू उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांना आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य मिळावे, या उद्देशाने आपल्या विद्यापीठ व आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण उमेदवारांसाठी सदर रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी होण्यापुर्वी ७ ते १० दिवसीय मुलाखत - पूर्व प्रशिक्षण आयोजित करण्यांत येत आहे. सदर प्रशिक्षण ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने निशुल्क आपल्या नजीकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये आयोजित करण्यांत येणार आहे.

याकरीता बेरोजगार व इच्छुक उमेदवारांसाठी मुलाखत - पूर्व प्रशिक्षणासाठी गुगल फार्म तयार करण्यांत आलेला आहे. तरी , आपल्या विद्यापीठ व आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील सर्व इच्छुक उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण उमेदवारांनी अनिवार्यपणे भरावा, याबाबत आपण आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना आवश्यक सूचना देण्यांत याव्यात .

तसेच सदर पुर्व- प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर दिनांक. १७ सप्टेंबर २०२६ रोजी उमेदवारांनी वरील नजिकच्या रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी सहभागी व्हावे याबाबतच्या सूचना आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना देण्याची आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती करण्यांत येत आहे.

करिता कार्यवाहीस्तव सोबत गुगल फॉर्म लिंक खालीलप्रमाणे सादर -
https://docs.google.com/forms/d/e/१FAIpQLSdlx३QsewUxOLBN४R७१tm८jSs३५YKqGGwtG५LzhKrsJLmLeow/viewform?usp=header

मुलाखत - पूर्व प्रशिक्षणाकरीता सहभाग नोंदविणेकरीता वरील लिंकचे QR Code -खालीलप्रमाणे-

आपला,

(रा.ना.माटे)
सहायक आयुक्त,
जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
मार्गदर्शन केंद्र,गडचिरोली.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर :-
मा.उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय,नागपूर.